# भूयारी गटारावरुन आजी-माजी आमदारांमध्ये शीतयुध्द

■ कारकुनी प्रस्ताव तयार करणे हीच का लोकप्रतिनिधींची उपलब्धी!

■ ही केवळ बोलाचीच कढी, अन् बोलाचाच भात-डॉ.सुनील देशमुख

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )**- रखडलेल्या भूयारी गटार योजनेच्याविरोधात अमरावतीचे माजी आमदार डॉ.सुनिल देशमुख यांची उच्च न्यायालयाने याचिका स्विकृत केल्यानंतर, लगेच दुसऱ्या दिवशी विद्यमान आमदार सुलभा खोडके यांनी शहरी भुयारी गटार योजनेच्या अनुषंगाने अमृत टप्पा-1 अंतर्गत रखडलेल्या भुयारी गटार योजनेच्या कामांचा आता केंद्र पुरस्कृत अमृत टप्पा दोनच्या सुधारित कृती आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. याकरिता 1 हजार 718 कोटी रुपये प्रस्तावित करून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची स्पष्टोक्ती वृत्तपत्रांमधून दिली. मात्र ही बोलाचीच कढी आणि अन बोलाचाच भात असल्याचे सांगत, कारकुनी प्रस्ताव तयार करणे हीच या लोकप्रतिनिधींची उपलब्धी असल्याचा आरोप डॉ.सुनील देशमुख यांनी केला आहे. भूयारी गटारावरुन आजी-माजी आमदारामध्ये शीतयुध्द छेडले असल्याचे पहायला मिळत आहे.





डॉ.सुनिल देशमुखांनी सांगितले की, रखडलेल्या भुयारी गटार योजनेच्या संबंधाने दाखल करण्यात आलेली जनहित याचिका उच्च न्यायालयाने स्विकारून शासनाला चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहे. डॉ.देशमुखांनी तब्बल पाच वर्षांची दीर्घ झोप काढून खडबडून जागे झालेल्या अमरावतीच्या विद्यमान लोकप्रतिनिधी यांनी लागलीच एक भले मोठे, लांबलचक प्रसिद्धी पत्रक काढून अमरावती शहर भुयारी गटार योजनेसाठी 1700 कोटी रुपयांचा कृती आराखडा प्रस्तावित केला असून भुयारी गटार योजना येणाऱ्या काळात पूर्ण करणार असल्याचा मनोदय व्यक्त करून डॉ.सुनील देशमुख राज्यमंत्री असताना ही योजना पूर्ण करण्याकरिता प्रयत्न का केले नाहीत? असा हास्यास्पद प्रश्न उपस्थित करून त्याचे या योजने बद्दलचे अज्ञान जाहीररीत्या प्रकट केले.

आपल्या गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात भुयारी गटार योजने करिता आपण अत्यंत निष्क्रिय राहिल्याबाबत स्वत:चा बचाव करण्याचा केविलवाना प्रयत्न त्यांनी केलेला आहे. उलट पक्षी 2018 मध्ये केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अमृत योजनेअंतर्गत 87 कोटी रुपयांचे शेवटचे काम डॉ. सुनील देशमुख यांचेच प्रयत्नाने मंजूर झालेले होते. त्यानंतर गेल्या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये नवीन काम मंजूर करणे तर दूरच, हेच मंजूर केलेले काम सुद्धा यशस्वी रित्या पूर्ण करण्यात ते सपशेल अपयशी ठरल्याचे त्यांनी प्रसिद्ध केलेल्या स्वत:च्या प्रसिद्ध पत्रकामध्ये अप्रत्यक्षरीत्या मान्य केले असल्याचे कोणत्याही सुज्ञ व्यक्तीने नीट वाचल्यास लक्षात आल्यावाचून राहत नाही. त्यांचा या योजनेबाबत अभ्यास व वाचन अजिबात नसल्याचे प्रकर्षाने जाणवते आहे. असे नसते तर त्यांनी अनेक सबबी सांगून असा बालिश प्रश्न उपस्थित केला नसता. असेही डॉ.देशमुख म्हणाले. गेल्या पाच वर्षात सुधारित योजनेचा फक्त आणि फक्त प्रस्तावच तयार केल्याची कारकुनी उपलब्धी असल्याचे ते स्वत:च मान्य करत हीच उपलब्धि साजरी करण्यासाठी इतकी मोठे प्रसिद्धी पत्रक काढावे लागल्याची खरमरीत टीका डॉ.सुनील देशमुख यांनी केली आहे.



### जाहीररित्या चर्चा करण्यास तयार

या विषयावर जाहीर रित्या शहरातील नागरिकांसमक्ष चर्चा करण्याची आपली तयारी असून कधीकधी, किती निधी या योजनेकरिता आपण आणला आहे. याची सुद्धा चर्चा करुया असे आव्हानच त्यांनी दिलेले आहे. संपूर्ण प्रसिध्दी पत्रकमध्ये त्यांनी गेल्या पाच वर्षात निधी किती आणला याबाबत साधे अवाक्षरही काढण्यात आलेले नाही. त्याचबरोबर मोठा गाजावाजा करून सिंभोरा ते अमरावती या मुख्य जलवाहिनी करिता 850 कोटी रुपये मंजूर करून आणल्याचे त्यापूर्वी त्यांनी जाहीर केले होते त्याचे काय झाले याचीही माहिती अमरावती कर जनतेस दिल्यास बरे होईल. असे डॉ.देशमुख म्हणाले.



अमरावती- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्पती भवनात करीना थापा हिला मानाचा प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान.



अमरावती-प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्राप्त विजेत्यांशी दिल्लीतील भरतमंडपम येथे मनमोकळ्या गप्पा मारल्या.

# चोरून नेलेली कार पंचवटी चौकात गवसली



### चोरट्याने आणून ठेवली, पोलिसांनी ताब्यात घेतली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिक्षक बँकेसमोर पार्क केलेली कार पंचवटी चौकात सापडली. सदर कार गाडगेनगर पोलिसांमार्फत तक्रारदार सुभाष सूर्यवंशी यांच्या स्वाधीन करण्यात आली आहे. ही कार्यवाही गुन्हे शाखा युनिट एकच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाळ येथील सुभाष ईश्वरा सूर्यवंशी (वय 40) हे पंचवटी चौकात असलेल्या शिक्षक बँकेत काही कामानिमित्त आले होते. त्यांनी त्यांची कार क्रमांक एमएच 10/सीएक्स 5288 ही बँकेसमोर उभी केली होती. काही वेळाने ते परतल्यानंतर त्यांना त्यांची वाहन दिसले नाही. त्यामुळे त्यांनी वाहनाबाबत आजूबाजूला चौकशी केली, पण कोणालाही काही माहिती नव्हते. त्यामुळे त्यानंतर सुभाष सूर्यवंशी यांनी गाडगेनगर पोलिसांत तक्रार केली. गाडगेनगर पोलिसांनी घटनेची नोंद करून घटनास्थळ गाठून तपास सुरू केला. दरम्यान दुसऱ्या दिवशी गुन्हे शाखा युनिट एकचे अधिकारी व अधिकारी तपासात गुंतले. पोलिसांनी बँकेच्या आवारातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यानंतर तिच कार अज्ञात आरोपींनी पंचवटी चौकात आणून उभी केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे गुन्हे शाखा युनिट एकने ती कार जप्त केली. कार गाडगेनगर पोलिसामार्फत फिर्यादी सुभाष सूर्यवंशी यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. गुन्हे शाखा एकचे पीआय गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली.

# पानबुडी मोटारसह केबल चोरी करणारे गजाआड

## 93 हजार 970 रुपयांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - शेतकऱ्यांच्या शेतातून पानबुडी मोटारसह केबल चोरून नेणार्या दोन आरोपींना गजाआड करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 26 डिसेंबर रोजी यश मिळाले. शुभम जगदीश भेंडे (वय 29, रा. पिंपळखुटा ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती) व राजु गणपत केवत (वय 42, रा. पिंपळखुटा ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून एकुण 93 हजार 980 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाहीकरीता मंगरुळ दस्तगीर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.



23 डिसेंबर रोजी विलास मारोतराव सोनवणे (48, वर्ष, रा. पिंपळखुटा) यांनी तक्रार दिली की, त्यांच्या शेतातील विहीरीतुन कोणीतरी अज्ञात इसमाने 9 हजार रुपये किमंतीचा पानबुडी मोटरपंप चोरुन नेली आहे. या तक्रारीवरुन मंगरुळ दस्तगीर पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करून तपास आरभंला होता. तसेच अशा प्रकारचा गुन्हा यापूर्वीही मंगरुळ दस्तगीर ठाण्यात गुन्हा नोंद होता. मोटार पंप चोरीच्या वाढत्या घटना पाहता पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी असे गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात चांदुर रेल्वे उपविभागातील पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम व त्यांचे पथक मंगरुळ दस्तगीर हद्दीत पेट्रोलींग करीत होते. दरम्यान गोपनिय माहिती मिळाली की, पिंपळखुटा येथील शुभम जगदीश भेंडे व राजु गणपत केवत यांच्याकडे दोन मोटार पंप आहे आणि ते विक्रीकरीता गावात विचारपुस करीत आहे. या माहितीवरून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी शुभम भेंडेला या गुन्ह्यांबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्याचा साथीदार राजु केवतसोबत हा गुन्हा केल्याचे कबुल केले. यावरून पोलिसांनी दोघांना अटक केली व त्याच्या ताब्यातून दोन पानबुडी मोटर पंप व केबल (किमंत 21980 रुपये), एक सुझुकी कंपनीची मोटार सायकल (किमंत 60 हजार रुपये), एक मोबाईल (किमंत 12 हजार रुपये) असा एकुण 93 हजार 980 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम, मुलचंद भांबुरकर, पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया यांनी केली.

# राजापेठ पोलिसांची द ब्लु बर्ड कॅफेवर धाड

## अश्लिल वर्तन करताना आढळले तरुण-तरुणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - राजापेठ पोलिसांनी 25 डिसेंबर रोजी सायंकाळी साईनगर रोडवरील द ब्लु बर्ड कॅफेवर धाड टाकली असता, तेथे काही मुल-मुली हे असभ्य व अश्लिल वर्तन करताना आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी चार तरुणांविरुध्द कारवाईचा बडगा उगारला.

राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रवि नगर ते साई नगर रोडवरिल सातुर्णा स्थित येथे हरियाली हॉटेल समोर असणार्या द ब्लु बर्ड कॅफेवर पोलीस निरीक्षक पुनित कुलट व त्यांच्या पथकाने बुधवारी सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास धाड टाकली. त्यावेळी सदर ठिकाणी काही मुले सार्वजनीक ठिकाणी असभ्यतेचे व अश्लिलतेचे वर्तन करित असतांना दिसुन आले. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून, तेथे उपस्थित तरुणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याचे नाव गाव विचारले असाता त्यांनी त्याचे नाव आशुतोष मुकेश डोंगरे (वय 24 वर्ष रा. नवसारी, अमरावती), सागर हरिहर शिंदे (वय 35 वर्ष रा.धानोरा गुरव, ता. ना. खडेश्वर, जि. अमरावती), साहिल दिनेश लांडगे (वय 20 वर्ष रा. धानोरा गुरव, ता. ना. खडेश्वर, जी. अमरावती), सचिन साहेवराव हिवराळे (30 वर्ष रा. राठी नगर, अमरावती) व रोहीत संजयराव गुलालकरी (वय 28 वर्ष रा. अंजनगाव बारी, अमरावती) असे सांगीतले. या घटनेच्या अनुषंगाने राजापेठ पोलिसांनी पाचही तरुणांविरुध्द कलम 110,117 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे कार्यवाही केली. सदर कार्यवाही प्रभारी पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट, पोलीस उपनिरीक्षक विकास मनपीया, विपुल हुलावळे, पोलिस हवालदार विनोद माहुरे, अमोल खंडेझोड यांनी केली आहे.

# स्पा सेंटर आड देह विक्रीच्या संशयांवरुन गोंधळ

### तिन मुलींचे पलायन, एक तरुण ताब्यात

### सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी आक्रमक

**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती,( दि.26 )** - इर्विन चौकाजवळील एका व्यापारी संकुलाच्या इमारतीमधील ऑरेंज स्पा सेंटरच्या आड देह विक्री सुरु असल्याच्या संशयावरून बुधवारी रात्री सामाजिक संघटनेचे पदाधिकारी पोहोचल्याने चांगलाच गोंधळ उडाला होता. या गोंधळानंतर कोतवाली पोलिसांसह मोठा ताफा घटनास्थळी दाखल झाला होता. या गोंधळादरम्यान तेथील तीन मुलींनी पलायन केल्याचा आरोप सामाजिक संघटनेने केला होता. त्यानंतर पोलिसांनी स्पा सेंटरचा मॅनेजर शर्माला ताब्यात घेतले होते. त्याच्याविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करून 149 प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. बुधवारी रात्री 12.30 वाजतापर्यंत कोतवाली पोलिस ठाण्यात या प्रकाराबाबत चांगलाच गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले.

इर्विन चौकाकडे उतरणाऱ्या पुलाशेजारीच एक मोठे व्यापारी संकुल असून, या संकुलाच्या तिसऱ्या माळ्यावर ऑरेंज स्पा मसाज सेंटर सुरु होते. या स्पा सेंटरमध्ये काही वेगळे गैरप्रकार चालतात, या ठिकाणी देह व्यवसाय सुरु असल्याचा आरोप करून काही हिंदुत्ववादी सामाजिक संघटनेचे पाच ते सहा पदाधिकारी बुधवारी रात्री स्पा सेंटरवर जाऊन धडकले. त्यावेळी तेथे काही मुली व एक मॅनेजर उपस्थित होता. तेथील व्यवस्था पाहून सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी आक्षेप घेतला. त्यामुळे संघटनेच्या पदाधिकार्यांचा मॅनेजरसोबत वाद झाला. दरम्यान या माहितीवरून हिन्दुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी तथा कालीमाता मंदिराचे विश्वस्त शक्ती ऊर्फ पप्पु महाराज हे देखील तेथे पोहोचले. या गोंधळामुळे पोलिसांचा ताफा सुध्दा तेथे पोहोचला. दरम्यानच तेथील तीन मुली पळून गेल्याचा आरोप संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला होता. पोलिसांनी येथील एकदरीत गोंधळाची स्थिती पाहता मसाज पार्लरमधील मॅनेजरला ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर सामाजिक शक्ती ऊर्फ पप्पु महाराज यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी पोलिस ठाण्यात पोहोचले होते. रात्री उशिरापर्यंत स्पा सेंटरमधील गैरप्रकारावर चांगलीच घमासान चर्चा सुरु होती.

# जिल्हा सुशासन निर्देशांकात अमरावती जिल्ह्याचा चौथा क्रमांक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला जिल्हा सुशासन निर्देशांक 2024 मध्ये महाराष्ट्रातील एकूण 36 जिल्ह्यापैकी अमरावती जिल्ह्याचा चौथा क्रमांक लागलेला आहे. सन 2023 मध्ये अमरावती जिल्ह्याचा सुशासन निर्देशांकाचे गुणानुक्रमांक 15 असा होता. त्या अनुषंगाने निर्देशांकाच्या वाढीबाबत जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व विभागांशी सांगड घालून क्षेत्रनिहाय बैठका घेण्यात आल्या. त्याचे नियोजन करुन त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यात आल्या.




महाराष्ट्र शासनाचा जिल्हा सुशासन निर्देशांक (डिजीजीआय) हा केंद्र शासनाचे सुशासन निर्देशांक (जीजीआय) च्या धर्तीवर विकसित करण्यात आलेला आहे. या निर्देशांकामध्ये जिल्ह्यातील प्रशासकीय, कृषी, आर्थिक, सामाजिक, आरोग्य, पर्यावरण, विधी व न्याय व इतर आवश्यक निकषांचा समावेश करण्यात आलेला आहे. या निर्देशांकामध्ये जिल्ह्यातील सुशासनाचे स्थितीचे मुल्यांकन करुन तुलनात्मक चित्र उपलब्ध करुन देणारे सर्व समावेशक व अंमलबजावणी करणे योग्य असे साधन आहे. या अंतर्गत कृषी आणि संलग्न क्षेत्र यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत गुणानुक्रमांक 15 वरुन थेट प्रथम क्रमांकावर तसेच नागरिक केंद्रित प्रशासन या क्षेत्रात गुणानुक्रमांक 20 वरुन 5 व्या क्रमांकावर झेप घेण्यात आली तसेच सामाजिक विकास या क्षेत्रात गुणानुक्रमांक दुसरा गाठण्यात आला.

सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि उपयुक्तता, पर्यावरण, वाणिज्य आणि उद्योग तसेच मनुष्यबळ विकास इत्यादी क्षेत्रांतील कामगिरीमध्ये जिल्ह्याची सुधारणा झालेली आहे. यासाठी प्रशासनातील विभागांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच मागे राहिलेल्या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणेबाबत संबंधितांना जिल्हाधिकारी कटियार यांनी सूचना दिल्या.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मुरुमाच्या ओव्हरलोड ट्रकांची जीवघेणी वाहतूक सुरूच

## उडणाऱ्या धुळीचे हजारो हेक्टरातील पीके खराब ■ तोंड दाखवून बेपत्ता झाले भरारी पथक

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.26 )** - बोराळा-परसापूर मार्गावरील खदानी वरून ओव्हरलोड मुरूम भरून धावणाऱ्या ट्रकांनी चांगलाच धिंगाणा घातला आहे. बेधडकपणे मुरूम भरून धावणारे ट्रक नागरिकांच्या जीवासह हजारो हेक्टरमधील पीकांसाठी संकट बनले आहे. शासकीय यंत्रणेने यावर निर्बंध लावणे गरजेचे झाले आहे. 'दैनिक महासागर' ने आपल्या 22 डिसेंबर रोजी आपल्या अंकात 'बोराळा रस्त्यावरील मुरूमाच्या ट्रकांची जीवघेणी वाहतूक?' या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केल्यावर बोळवण म्हणून तोंड दाखविण्याकरिता आलेले भरारी पथक पुन्हा बेपत्ता झाले आहे. याबाबत महसूल विभागासह आरटीओ व पोलीस विभाग आंधळ्याच्या भूमिकेत दिसत आहेत. मुरुम तस्करांनी सर्वच विभागांशी संगणमत केल्याचा आरोप गावकरी करित आहेत.





तपासणी नाक्यावर बेपत्ता असलेले भरारी पथक

### 2 तासाचा परवाना आणि चार फेऱ्या

गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या ट्रकांना महसूल विभागाकडून गौण खनिज वाहून नेण्याकरिता किलोमीटर प्रमाणे वेळेचा परवाना दिला जातो, ज्याला बिल्टी संबोधले जाते. जास्त किलोमीटर दाखवून एका बिल्टीवर जास्त फेऱ्या मारल्या जात आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास, बोराळा-परसापूर येथील खदानीवरुन परतवाडा कमी अंतर आहे, ट्रक अवघ्या 25 मिनीटात खदानीवरुन परतवाडा येथे मुरुम आणून टाकतो. ट्रक मालक किंवा खदान संचालक महसूल विभागाकडून दर्यापूर येथे मुरुम टाकण्याच्या नावावर 2 तासाची बिल्टी काढतो, आणि या दोन तासात परतवाडा येथे चार फेऱ्या मारुन परवान्याच्या चारपट मुरुमाची चोरी करतो. ही चोरी रोखण्याकरिता महसूल विभाग भरारी पथकाची नियुक्ती केली जाते, मात्र हे भरारी पथकच फरारित राहत असल्याचे येथे राजरोसपणे मुरुमाची चोरी केल्या जात आहे.

### आरटीओ, पोलीस विभागाला देणेघेणे नाही

बोराळा येथील खदानी वरून ओवरलोड मुरूम भरून धावणाऱ्या अधिक तर ट्रकांच्या कागदपत्राची मुदत संपली आहे. आरटीओ विभागाने विना इन्शुरन्स, विदाऊट टॅक्स, फिटनेस संबंधित कागदपत्रे मुरुमावर धावणाऱ्या ट्रकांची तपासल्यावर मोठ्या प्रमाणात ट्रकांवरती दंड आकारल्या जाऊ शकतो. पथ्रोट पोलिसांच्या हद्दीमध्ये बेधडकपणे धावणारे मुरूमांच्या ट्रकांवर कारवाई करण्याकरिता पथ्रोट पोलीसही आंधळे झालेले दिसत आहे.

### भरारी पथक नावापुरते

महसूल विभागाने आठवड्यात 7 दिवस विविध मंडळ अधिकारी, कर्मचारी व पोलीस कर्मचाऱ्यांची ड्युटी तपासणी नाक्यावर लावली आहे. परंतू हे भरारी पथके नावापुरतेच दिसत आहेत. वृत्त प्रकाशित झाल्यावर एक प्रक्रीया म्हणून तोंड दाखविण्याकरिता या तपासणी नाक्यावर उपस्थित राहतात. नंतर मात्र बेपत्ता होतात.

### रस्ता व पीकांचे वाजले तीनतेरा

महसूल विभागाने खदान चालकाला परवानगी देताना व गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना महसूल प्रशासनाने 21 प्रकारच्या अटी व शर्ती घालून दिल्या आहेत, ज्यामध्ये ओव्हरलोड वाहतूक करु नये, ट्रकवर व्यवस्थित ताडपत्री झाकलेली असावी, ट्रकांमधून गौण खनिज खाली सांडू नये, वाहनाचा वेग मर्यादित असावा इत्यादी. परंतू या अटी व शर्तींना धाब्यावर बसवून येथे गौण खनिजाची वाहतूक केली जात आहे. ओव्हरलोड वाहनामूळे रस्त्याची व उडणाऱ्या धुळीमूळे येथील गहू, हरभरा, संत्रा व इतर पिकांचे तीनतेरा वाजले आहे. त्यामूळे येथील शेतकरी आता रास्तारोको करण्याच्या मानसिकतेत दिसत आहेत.



# मालखेड सरपंचपदी भाजपच्या लता पाटील यांची निर्विरोध निवड

## भाजपाचे वर्चस्व कायम

## सरपंचाच्या राजीनाम्यामुळे रिक्त होती जागा

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.26 )**- तालुक्यातील मालखेड ग्रामपंचायत ची सरपंच पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. यावेळी सरपंचपदी भाजपाच्या लता लक्ष्मण पाटील या निर्विरोध निवडून आल्या. गत सरपंचपदी असणाऱ्या कल्पना प्रमोद निचत यांच्या राजीनाम्यामुळे सरपंच पद रिक्त झाले होते. एकूण 11 सदस्यांची असणाऱ्या या ग्रामपंचायतमध्ये 6 भाजपच्या व 5 काँग्रेसचे सदस्य निवडून आले होते. गेल्या निवडणुकीत सरपंचपदी कल्पना प्रमोद निचत यांचा विजयी झाला होता, मात्र त्यांच्या राजीनाम्यामुळे जागा रिक्त झाल्याने पुन्हा निवडणूक झाली. काँग्रेससमर्थीत पॅनलकडून सरपंच पदासाठी उमेदवार न दिल्याने यावेळी सरपंच पदासाठी उमेदवारी अर्ज केलेल्या लता पाटील निर्विवाद सरपंचपदी आरूढ झाल्या. गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी नवनियुक्त सरपंचाचे स्वागत केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी सतिश गोसावी, ग्राम महसूल अधिकारी प्रफुल्ल गेडाम, ग्रामपंचायत अधिकारी मदनगोपाल गवळी, पोलीस पाटील एम. व्ही माहुरे यांनी काम पाहिले.



### एकाच पंचवार्षिकमध्ये तीन सरपंच

ग्रामपंचायत मालखेड ची सर्वात्रिक निवडणूक पार पडल्यानंतर सुरवातीला लता रवींद्र डोक सरपंच झाल्या होत्या. त्यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांच्या राजीनाम्यानंतर सरपंच पदाची पुन्हा निवडणूक पार पडली. तेव्हा कल्पना प्रमोद निचत या सरपंचपदी आरुढ झाल्या. त्यांनीसुध्दा राजीनामा दिला आणि यावेळेस लता लक्ष्मण पाटील या सरपंचपदी निर्विरोध निवडून आल्या.

# पदाचा दुरुपयोग केल्याचे कारणावरुण सातेगाव येथील सरपंच अपात्र घोषीत

## प्रकरण घरकुल क्रमवारीत नंबर डावलल्याने आले अंगलट

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.26 )**- तालुक्यातील सातेगांव ग्रामपंचायतच्या संरपंच छाया राजेंद्र वानखडे यांना त्यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यात कसुर, अनियमितता केल्याचे कारणामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1959 चे कलम 39(1) मधील तरतुदीनुसार त्यांना सरपंच तथा पदाकरिता अपात्र घोषीत करण्यात आले आहे.

सातेगाव ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास योजनेत नियमबाह्य पध्दतीने घरकुल योजनेत क्रमवारी नंबर डावलणे, गुणक्रमे लाभार्थी वगळून निकटच्या लाभार्थास लाभ पोहचवणे ईत्यादी बाबत सातेगाव येथीलच तक्रारदार गजानन शे. चव्हाण यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे सन 2023 मध्ये ग्रामपंचायत अधिनियम 1959 कलम 39(2) अन्वये तक्रार दाखल केली होती. दरम्यान लाभार्थ्यांनी आपले न्याय मागणी करीता अंजनगांव सुर्जी पंचायत समिती तथा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आमरण उपोषणही केले होते. दरम्यान सन 2023 ला दाखल प्रकरणाचे निकाल धडकले असुन आयुक्त कार्यालयाचे आदेशान्वये सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांना पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यात कसुर, अनियमितता केल्याचे कारणे संरपंच पदाकरीता अपात्र घोषीत करण्यात आले. या आदेशामूळे तालुक्यातील सातेगाव सारख्या मोठ्या गावातील सरपंचाचे अपात्रतेवरुन सातेगावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.




> यासंदर्भात सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांचेशी सपर्क साधला असता यामध्ये तत्कालीन सचिव आणि पंचायत समीतीचा दोष असून या निकालाविरोधात आम्ही वरच्या न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

# सावळी दातुरा येथे बेमुदत आमरण उपोषण

## विकास निधीच्या दुरुपयोग विरोधात आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.26 )**- अनेक ठिकाणी तक्रारी करूनही न्याय न मिळाल्यामुळे ग्रामपंचायत सावळी दातुरा अंतर्गत खाजगी ले आऊटमध्ये पन्नास लाख रुपयांचे कामांचे विरोधात गावातील प्रहार कार्यकर्ते निलेश आखरे यांनी उपोषणाचं हत्यार उपसले.



95/5 निधी मधुन ग्रामपंचायत सावळी दातुरा अंतर्गत करोडो रुपयांची कामे मंजूर झाले होते. त्या मध्ये गावातील नादुरुस्त रस्ते दुरुस्ती न करता लगतच्या अंजनगाव रोडवरील एका खासगी ले आउट मध्ये पन्नास लाखांचे दोन रस्ते बांधून दिले आहेत.

यामध्ये सरासरी ग्रामपंचायत अधिकारी आणि सरपंच सामिल असल्याचा आरोप उपोषणकर्त्याचं आहे. ग्रामसभेत शिवीगाळ करणार रोजगार सेवकावर निलंबनाची कारवाई करावी, ग्रामसभेची सीसीटीव्ही फुटेज रेकॉर्डिंग गहाळ करणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

# शैलेश अग्रवाल यांची गोवा राज्य प्रभारी पदी निवड

## तीन केंद्रशासित प्रदेशांचीही दिली जबाबदारी

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.26 )** - अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या किसान सेलच्या राज्य कमिटी व प्रभारींच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या आहेत. वर्धा येथील काँग्रेसचे नेते शैलेश अग्रवाल यांची गोवा राज्य प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शैलेश अग्रवाल गोवा राज्या सोबतच दीव दमन, दादरा नगर-हवेली व लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशाचेही प्रभारी राहतील.



शैलेश अग्रवाल हे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय समन्वयक असून त्यांच्यावर पक्षाने नवीन जबाबदारी दिली आहे. गोव्यात पुढील दोन वर्षानंतर विधानसभेच्या निवडणुका आहेत. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असून पक्ष संघठन मजबूत करण्याची जबाबदारी अग्रवाल यांच्यावर आहे. अग्रवाल यांनी राष्ट्रीय स्तरावर अनेक राज्यात निवडणूक समन्वयक म्हणून काम केले आहे यापूर्वी त्यांना आसाम, उत्तराखंड, तेलंगणा व गोवा या राज्यांत निवडणूक प्रभारी म्हणूनही पाठविण्यात आले होते. अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, खासदार सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, काँग्रेसच्या सरचिटणीस खासदार प्रियंका गांधी यांचे अग्रवाल यांनी आभार मानले असून पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठापूर्वक पार पाडू अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.



# नागपूर अधिवेशनात मीटर रिडर संघटनेचे उपोषण

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.26 )**- नागपूर येथे विधानसभा अधिवेशन काळात महाराष्ट्र मीटर रिडर संघटनेचे तीन दिवसीय उपोषण पार पडले. या मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील कंत्राटी मीटर रिडर संघटनेचे सर्व कामगार उपस्थित होते. अचलपूर डिव्हिजन मधून निकेश पिंपळकर, रोशन शेवाळे, प्रकाश कर्णिक, विजय इंगळे, मनोज बेदरकर, संजय कथिलकर, सचिन शिरभाते, रामदास गिरूहे, अमोल अग्रवाल, निलेश मोरे, संदीप गिरनाळे, संदीप यावले, रितेश माहोरे, मोहमद अन्सारी इत्यादी मीटर रिडर नागपूर अधिवेशनातील उपोषणासाठी उपस्थित होते.

# गौरखेडा कुंभी येथील रस्त्याच्या कामात कोट्यवधी रुपयांची अनियमितता?

## दोन महिन्यातच लागली वाट

**महासागर प्रतिनिधी**

**गौरखेडा कुंभी ( दि.26 )** - अचलपूर पंचायत समिती अंतर्गत गौरखेडा कुंभी गावातील सिमेंट रस्ता बांधकामात मोठ्याप्रमाणात अनियमितता झाला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. असून यासाठी जबाबदार असलेल्या बांधकाम ठेकेदाराचे देयक थांबवावे, अशी मागणी स्थानिक युवा कार्यकर्ते नितीन शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. आमदार निधीमधून 25/15 या शिर्षाखाली सदर रस्त्याचे बांधकाम झाले आहे. ज्यामध्ये नर्सरी ते हनुमान मंदिरापर्यंत आणि पॅनेशिया ते पाण्याची टाकीपर्यंत दोन्ही रस्त्याचे सिमेंट बांधकामाचा समावेश आहे.










सदर रस्ते बांधकामात करताना बांधकामाची माहिती देणारा फलक जाणीवपूर्वक लावण्यात आले नाही. या रस्ता बांधकामाची माहिती जाणून घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग अचलपूरला माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागण्यात आली; मात्र अद्यापपर्यंत शिंदे यांना माहिती पुरविण्यात आली नाही. त्यामुळे सदर रस्त्याच्या बांधकामावर किती निधी प्राप्त झाला, पैकी किती खर्च करण्यात आला, रस्त्याचे प्राकलन, रस्त्याची लांबी, रुंदी आणि जाडी तसेच बांधकाम विभागाने घेतलेले रस्त्याचे मोजमाप याबाबत काहीच माहिती नाही. उल्लेखनीय म्हणजे सदर रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यावर काही दिवसातच रस्त्याला फार मोठे जागोजागी तडे गेले आहे. त्यामध्ये दुचाकी आणि सायकलचे चाक फसून फार अपघात होण्याची शक्यता आहे. वाहनचालकांना डोळ्यात तेल घालून आणि मोठी कसरत करून वाहने चालवावे लागतात. या ठिकाणी काही किरकोळ अपघातदेखील झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावरील सिमेंटची धूळ उडू लागली आहे. त्यामुळे या दोन्ही रस्त्यावर लाखो रुपये खर्च करून त्याचे काहीच फलीत झाले नसून उलट या रस्त्यामुळे अपघाताची शक्यता बळावली आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई होईपर्यंत रस्ता बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराचे देयक काढू नये, अशी मागणी नितीन शिंदे यांनी केली आहे.

### ग्रामपंचायत सदस्यही मूंग गिळून गप्प

गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत हद्दीतील सर्वच रस्त्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासकीय निधीतून गौडबंगाल केले आहे अशी ओरड गावातील लोक करत आहेत. ज्या ज्या वार्डातील कामेही निकृष्ट दर्जाची झाली आहेत तेथील ग्रामपंचायत सदस्य सुद्धा मुंग गिळून चिडीचूप बसले आहेत. त्यांच्या अशा वागण्यामुळे गावातील नागरिकांना आश्चर्य वाटतं आहे.

# विज्ञान प्रदर्शनीमध्ये हरणे विद्यालयाने मारली बाजी



## प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.26 )**- 52 वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी दि.19 व 20 डिसेंबर रोजी येथील सेंट मेरी इंग्लिश स्कूल येथे आयोजित करण्यात आली होती. या प्रदर्शनी मध्ये प्राथमिक गटातून 43 व माध्यमिक गटातून 35 अशा एकूण 78 प्रतिकृतीचा समावेश होता. यामध्ये अंजनगाव सुर्जी येथील पंचफुलाबाई हरणे विद्यालय ची विद्यार्थिनी माहेश्वरी मनोहर आवंडकर हिच्या %स्मार्ट सिक्युरिटी ब्रिज फॉर फ्लड, 'सुरक्षित पूल', या प्रतिकृतीचा प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक आला.

ही प्रतिकृती तयार करण्यामागचा उद्देश हाच की पावसाळ्यामध्ये नदीच्या पुलावरून पाणी वाहताना अनेक दुर्घटना होताना दिसतात हे एक अत्यंत गंभीर समस्या आहे. विशेषत: ग्रामीण किंवा डोंगराळ भागांमध्ये. अशा परिस्थितीत पुलावरून प्रवास करताना अपघात होण्याची शक्यता जास्त असते.

यामध्ये दरवर्षी अनेक लोकांचा बळी जातो मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी सुद्धा होते ही समस्या दूर करण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. या नाविन्यपूर्ण प्रकल्पाने विशेष आकर्षण निर्माण केले. हा प्रकल्प पूर व्यवस्थापनासाठी हायड्रोलिक सेंसर तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आला आहे, जो नैसर्गिक आपत्तीच्या काळात जीवित हानी व सार्वजनिक मालमत्तेचे हानी कमी करण्यास मदत करतो. वाहन चालकाचे व प्रवाशांचे प्राण वाचू शकतो. या प्रकल्पाद्वारे पुलावरून जलस्तर वाढून धोक्याची पातळी गाठल्यास अपघाताची संख्या कमी करता येते तसेच रिअल टाईम मॉनिटरिंग होण्यास मदत होते. या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन गणित शिक्षक संजय शेळके यांनी केले. या विद्यार्थिनीचे संस्थाध्यक्ष जगनराव हरणे, उपाध्यक्ष केशवराव हरणे तसेच मुख्याध्यापिका जयश्री कळमकर यांनी तिचे कौतुक करून, सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले, त्याचबरोबर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुद्धा माहेश्वरी आवंडकर हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.